# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 1.05.2025** **वार-गुरुवार**

---

**आयुष राज्यमंत्री**

आयुष प्रणाली आकर्षणाचे केंद्र बनत असून जनऔषधी केंद्राच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केलं. पुण्यातील लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेमध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय आयुष मिशन परिषदेचे उद्घाटन आज केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज झालं त्यावेळी ते बोलत होते. आयुष औषध केंद्र तहसील स्तरावर उघडण्यात येणार आहेत . यामुळे आयुर्वेदासह आयुषच्या सर्व यंत्रणांची सर्व औषधे एकाच ठिकाणी स्वस्त दरात उपलब्ध होतील असंही जाधव यावेळी म्हणाले.

**महाराष्ट्र दिन**

पुण्यातल्या शिवाजीनगरच्या पोलिस संचलन मैदानावर आज महाराष्ट्र दिनानिमित्त उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे संपर्कमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. पोलिस दलाने संचलन करत मानवंदना दिली. संयुक्त महाराष्ट्रात बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना पवार यांनी आदरांजली वाहिली आणि जनतेला महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्या हस्ते महापालिकेच्या मुख्य भवनात ध्वजारोहण करण्यात आलं.

**उड्डाण पुल**

आगामी पाच वर्षात महाराष्ट्राच्या, वेगवेगळ्या शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासन कटीबद्ध आहे. पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर तसेच पुणे महानगर प्रदेश क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाधिक निधी दिला जाईल, अशी ग्वाही पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी कमान ते फनटाइम चित्रपट गृहापर्यंत बांधण्यात आलेल्या 2 हजार 120 मीटर लांबीच्या पुलाच्या उद्घाटन प्रसंगी आज पवार बोलत होते.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासने, महानगर पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आदी यावेळी उपस्थित होते. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर वाढत असल्यामुळे पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पुण्याला मुळशी धरणाचे आणि पिंपरी चिंचवडला ठोकरवाडी धरणाचे पाणी मिळावे असा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचं पवार यावेळी म्हणाले. पुणे जिल्ह्याला एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याच्या अंतर्गत जिल्ह्यातल्या 37 ठिकाणांचा समावेश करण्यात आला आहे. या माध्यमातून किमान 50 हजार जणांना थेट तर 5 लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आलं असल्याचंही पवार यांनी यावेळी सांगितलं आहे. या पुलासाठी सिंहगड रस्त्यावरील रहिवाशांची गेल्या अनेक वर्षाची मागणी होती. या पुलाच्या निर्मितीमुळे वाहतुकीवरील ताण कमी होईल असं केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सांगितलं.

**100 दिवस**

मुख्यमंत्री 100 दिवस कृती आराखडा उपक्रम अंतिम मूल्यमापनात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महापालिका श्रेणीत संपूर्ण महाराष्ट्रात दुसरे स्थान पटकावलं आहे. गुणवत्ता परिषदेने घेतलेल्या मूल्यमापनात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला 100 पैकी 85 पूर्णांक 71 गुण मिळाले. सुलभ माहिती देणारी संकेतस्थळ, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तक्रार निवारण यंत्रणा, जीआयएस आधारित मालमत्ता कर सुधारणा, स्मार्ट सेवा सुविधा, स्वच्छतेला प्राधान्य आदी महत्वाचे उपक्रम पिंपरी चिंचवड महापालिकेने राबवले होते.

**उर्दू माध्यम विज्ञान**

पुणे महापालिकेच्या बोपोडी इथल्या उर्दू माध्यमिक विद्यालयात उर्दू माध्यमचे विज्ञान शाखेचे उच्च माध्यमिक विद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला आहे. या कनिष्ठ महाविघालयाचा संपूर्ण खर्च पुणे महापालिका करणार आहे.

**समर्थ भारत**

समर्थ भारतासाठी विकसित भारतासाठी प्रत्येकाच्या हाताला काम मिळणे आवश्यक आहे असं मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र दिनानिमित्त पुण्यातील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम इथं यशस्वी संस्थेच्यावतीने प्रकाशित करण्यात येणाऱ्या यशोगाथा विशेषांकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते.

**रक्तदान**

महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने पुण्यातील यशदामधील नवनियुक्त प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात योगदान दिले. या रक्तदान शिबिरात जवळपास 71

जणांनी रक्तदान करून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. यशदाचे महासंचालक निरंजन कुमार सुधांशू यांनी या रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले.

**नवीन मराठी शाळा**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पुण्यातील नवीन मराठी शाळेच्या संकेतस्थळाचे आणि झेप या अंकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार अभय कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका कल्पना वाघ , राजश्री ठकार यावेळी उपस्थित होते.

**वाहने**

पुणे पोलिसांच्या वाहतूक विभागानं 55 बेवारस वाहनं जमा झाली असून, गेले अनेक दिवस ही वाहन समर्थ वाहतूक विभागात पडून आहेत. येत्या 15 दिवसांत अधिकृत मालकी कागदपत्रं सादर करून वाहन नागरिकांनी घेऊन जावीत अन्यथा या वाहनांचा लिलाव करण्यात येईल असं वाहतूक विभागाचे उपायुक्त अमोल झेंडे यांनी स्पष्ट केलं आहे. या वाहनांची यादी पुणे पोलिसांच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे.

**क्रिकेट**

वॉरीयर्स करंडक' 15 वर्षाखालील मुलींच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत माहि सुंकाळे हिच्या गोलंदाजीच्या जोरावर एसएआरके अ‍ॅकॅडमी संघाने एसपी स्पोटर्स झोन संघाचा 79 धावांनी पराभव करून सलग दुसरा विजय मिळवला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 41 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 22 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**